बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय : लोकमंगल ,1501 .शिवाजीनगर ,पुणे05
टेलि -020:25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्राच्या वित्तीय समावेशन अभियानास अधिक प्रोत्साहन

## श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास

**पुणे दिनांक १५ मार्च, २०२३** : सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रची सहयोगी असलेल्या ग्रामीण महिला व ग्राम विकास मंडळाने श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास यांच्यामध्ये करार करण्यात आला आहे. या कराराद्वारे महाराष्ट्र राज्यातील स्वयं सहाय्य बचत गटांची कर्जाशी जोडणी करून तंत्रज्ञानाद्वारे आतापर्यंत बँकिंग सेवेपासून वंचित राहिलेल्या घटकांच्या वित्तीय समावेशनाला चालना दिली आहे.

या कराराद्वारे बँक स्वयं सहाय्य बचत गटांच्या प्रवर्तनाला हातभार लावून बँकिंग सेवांपासून वंचित असलेल्या घटकांचे वित्तीय समावेशन करून विविध विमानकाद्वारे वित्तसहाय्य करून त्यांची कर्जाशी जोडणी करण्यास हातभार लावेल. यासाठी भारतीय रिझर्व बँकेने प्रवर्तित केलेले व्यवसाय प्रतिनिधी / बँकिंग सुविधा पुरवठादार प्रारूप बँक ऑफ महाराष्ट्र अवलंबणार असून श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास हे शेवटच्या माणसापर्यंत बँकेच्या विविध वित्तीय योजना पोहोचवण्यासाठी व्यवसाय प्रतिनिधी / बँकिंग सुविधा पुरवठादार म्हणून कार्यरत असतील. बँक ऑफ महाराष्ट्रचे सहयोगी असलेले महिला व ग्राम विकास मंडळ हे देशभरातील स्वयं सहाय्य बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी हातभार लावतील. त्याशिवाय बँकेने श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास यांच्याशी सामंजस्य करार केला असून ते बेळगाव जिल्ह्यात स्वयं सहाय्य बचत गटांच्या कर्जाच्या जोडणीसाठी बँकेचे व्यवसाय प्रतिनिधी / बँकिंग सुविधा पुरवठादार म्हणून कार्यरत असतील.

समाजातील सर्व क्षेत्रांपर्यंत पोहोचून सर्वात शेवटच्या माणसाला बँकिंग सेवा पुरविण्याचे आमचे ध्येय असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी या सहयोगाविषयी टिप्पणी करणताना सांगितले. यामुळे वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आमच्या प्रयत्नांना बळ मिळेल व बँकिंग सेवांपासून वंचित असलेले घटक देखील यामुळे सक्षम होतील असेही त्यांनी सांगितले.

या सहयोगामुळे व उपलब्ध तंत्रज्ञानामुळे बँक तळागाळातील लोकांना सहजतेने बँकिंग सेवा उपलब्ध करून देत असून त्यांना स्वावलंबी करून सामाजिक व आर्थिक उत्थानाचे अधिक व्यापक ध्येय व उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होईल असे बँक ऑफ महाराष्ट्राचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी सांगितले.

बँक ऑफ महाराष्ट्र आपली सर्वांगीण वाढ करण्याचे दृष्टीने प्रयत्नशील असून समाजातील प्रत्येक घटकाला बँकिंग सेवा पुरविल्याशिवाय हे शक्य होणार नाही असे बँक ऑफ महाराष्ट्राचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे यांनी सांगितले. तंत्रज्ञानाचा वापर करून आम्ही बँकिंग सेवा लाभार्थि आणि सेवावंचित वर्गातील दरी दूर करण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि येणाऱ्या काळात हे गेम चेंजर म्हणून सिद्ध होईल असेही त्यांनी सांगितले. येत्या काही

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय : लोकमंगल ,1501 .शिवाजीनगर ,पुणे05
टेलि -020:25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

दिवसात अशा प्रकारच्या स्त्रोतन व संनियंत्रणातील सहकार्य व सहयोगामुळे अनेक बँकांना वाढण्यासाठी व त्याद्वारे आपला विकास साध्य करून घेता येईल असेही त्यांनी सांगितले. .

या सामंजस्य करारामुळे श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास हा जातपात, आणि सामाजिक दर्जाच्या निरपेक्ष कर्नाटकातील सर्व समुदायांच्या पर्यंत पोहोचू शकणार आहे असे न्यासाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री एल एच मंजुनाथ यांनी सांगितले. बँक ऑफ महाराष्ट्र व ग्रामीण महिला बाल विकास मंडळाशी सहयोगाने बँकिंग सेवेपासून वंचित राहिलेल्या गरीब कुटुंबांच्या जीवनाला स्पर्श करणारी विशिष्ट प्रारूपे आम्ही तयार केली असून त्यामुळे स्वयं सहाय्य बचत गटांच्या कर्ज जोडणीला मदत व चालना मिळणार आहे. "प्रत्यक्ष कालिक संनियंत्रण प्रणाली अवलंबल्यामुळे ग्रामीण महिला बाल विकास मंडळ हे श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यासाच्या स्वयं सहाय्य बचत गटांच्या कर्ज जोडणीच्या तीन दशकांच्या अनुभवाचा फायदा उठवू शकेल, असेही त्यांनी सांगितले.

**बँक ऑफ महाराष्ट्र विषयी**

बँक ऑफ महाराष्ट्र ही देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील पुणे येथे मुख्यालय असलेली अग्रगण्य बँक आहे. बँकेच्या देशभरात २१३७ शाखा असून वित्तीय वर्ष २०२१ व २०२२ मध्ये व्यवसाय वाढीत म्हणजे कर्ज व ठेवींमध्ये वाढीत बँकेने सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकांमध्ये अव्वल क्रमांक पटकावला आहे. दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजी समाप्त झालेल्या ९ महिन्यात बँकेने पतवाढ, मत्तांची गुणवत्ता यामध्ये सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकांमध्ये अव्वल क्रमांक पटकावला आहे.

**अधिक तपशीलासाठी** www.bankofmaharashtra.in या संकेतस्थळाला भेट द्या

**श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास**

श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास ही कर्नाटक राज्यात कार्यरत एक बिगर शासकीय संघटना असून स्वयं सहाय्य बचत गटांच्या प्रवर्तनासाठी व त्यांच्या कर्जांची बँकिंग प्रणालीशी जोडणी करण्यासाठी गेली चाळीस वर्षे न्यास कार्यरत आहे. श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यासाने बँकिंग सेवेपासून वंचित राहिलेल्या घटकांच्या पर्यत पोहोचण्यासाठी अनेक प्रारूपे विकसित केली आहेत. भारतीय रिझर्व बँकेने प्रवर्तित केलेले व्यवसाय प्रतिनिधी / बँकिंग सुविधा पुरवठादार प्रारूप त्यांनी स्वीकारले असून या प्ररुपाद्वारे गरजू घटकांना वित्तीय साहाय्य देणाऱ्या विविध राष्ट्रीयीकृत बँकांच्या अनेक वित्तसहाय्य योजनांच्या माध्यमातून अर्थसहाय्य पुरविले आहे. आजघडीला श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास सुमारे रु १७००० कोटी एवढ्या आकाराचे कर्ज व्यवहार चालवत आहे. श्री क्षेत्र धर्मस्थळ ग्रामीण विकास प्रकल्प बीसी न्यास देशातील बिगर शासकीय क्षेत्रातील सर्वात मोठी संस्था आहे.